ठाणे महानगरपालिका, ठाणे

(मालमत्ता कर विभाग)

**जाहीर सूचना**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील जे मिळकतधारक त्यांच्या पहिल्या सहामाहीच्या मलामत्ता करासोबत दुसऱ्या सहामाहीची संपुर्ण रक्कम महापालिकेकडे जमा करतील, अशा मिळकतधारकांना त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या रक्कमेवर खालीलप्रमाणे सूट देण्यात येते.

| अ.क्र | कालावधी | सूट (Early Bird Incentives) सवलत (दुसऱ्या सहामाहीच्या मालमत्ता कर रक्कमेवर) |
|---|---|---|
| १ | ३१ मे २०१९ पर्यंत भरल्यास | १० % |
| २ | १ जून ते ३० जून २०१९ पर्यंत भरल्यास | ४ % |
| ३ | १ जुलै ते ३१ जुलै २०१९ पर्यंत भरल्यास | ३ % |
| ४ | १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत भरल्यास | २ % |

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता करामधील पहिल्या सहामाहीच्या मालमत्ता करासोबत दुसऱ्या सहामाहीची संपुर्ण रक्कम महापालिकेकडे दि.३१ मे २०१९ पर्यंत जमा करतील, अशा मिळकतधारकांना त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या मालमत्ता कराच्या रक्कमेतील सामान्य करावर (अग्निशमन कर वगळता) १० % सवलत देण्यात येते.

सदर सवलतीच्या कालावधीमध्ये **दि.१५ जून २०१९** पर्यंत मुदतवाढ करण्यात आली आहे.

करदात्यांना मालमत्ता कर www.thanecity.gov.in या महापालिकेच्या संकेतस्थळावरील (इ) सुविधा (मालमत्ता कर) यावरुन किंवा (माय पिटॅक्स) (Property tax/ My Ptax Link Under E Services) या लिंकवरून तसेच myptax.thanecity.gov.in या लिंकवर ऑनलाईन पध्दतीने भरण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तरी मिळकतधारकांनी / नागरिकांनी या सवलतीचा जास्तीत जास्त फायदा घेऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीताचा मालमत्ता कर विनाविलंब भरुन, महापालिकेस सहकार्य करावे.

मा. महापालिका आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.

(ओमप्रकाश दिवटे)
उपआयुक्त (कर)
ठाणे महानगरपालिका, ठाणे